स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रामीण विकासात महिला सरपंचाची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ - हिंगोली जिल्हा)

मानवविज्ञान विद्याशाखे अंतर्गत समाजशास्त्र विषयात पीएच.डी.पदवी मिळविण्यासाठी सादर करावयाचा संक्षिप्त संशोधन आराखडा.

: संशोधक विद्यार्थिनी :

शुभांगी प्रभाकर जावळे

: मार्गदर्शक :

प्रा. डॉ. आनेराव एम. एम.

(समाजशास्त्र विभाग प्रमुख)

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड

ता. लोहा जि. नांदेड

: संशोधन केंद्र :

सामाजिकशास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट २०२३

ग्रामीण विकासात महिला सरपंचाची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन
(विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा)

1) प्रस्तावना :

भारत देश हा खेड्यांनी मिळून बनलेला देश आहे. आजही भारतात खेड्यात राहणा-या लोकसंख्येचे प्रमाण तुलनेने शहरात राहणाऱ्या लोकसंख्येपेक्षा अधिक आहे. म्हणूनच सर्वच समाजशास्त्रज्ञांनी भारतास 'खेड्यांचा देश' म्हटले आहे. अशा परिस्थितीत ग्रामीण समाजाचे अध्ययन केल्याखेरीज खरा भारत आपणास समजणार नाही ही वस्तूस्थिती आहे. भारतीय खेडी अनेक वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. त्यात ग्रामीण समाजाचे महत्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची 'पंचायती व्यवस्था' ही पंचायत व्यवस्था खेड्यांचे संगठण, प्रशासन व सामाजिक व्यवस्था इत्यादी कार्य प्राचीन काळापासून करतांना दिसते. वैदिक पूर्व तसेच वैदिक काळापासून (इ.स.पूर्व ३००० ते १०००) भारतात ग्रामपंचायतीचा उगम झाला. गावातील संपूर्ण समाज जीवनाचे सूत्र पंचायतीच्या हाती होते. ग्रामीण भागातील ग्रामपंचायती लोकतंत्रात्मक शासन व्यवस्था आणि सामाजिक संगठणाची आधारशिला आहे. देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक व्यवस्थामध्ये पंचायतीचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. १८ व्या शतकापर्यंत या ग्रामपंचायती स्वतंत्र स्वयंपूर्ण व स्वायत्त होत्या. पण इंग्रज काळात पंचायतीराज व्यवस्था मोडकळीस आली होती. त्यामुळे ग्रामीण भागात अनेक सामाजिक, आर्थिक व राजनैतिक समस्या निर्माण झाल्या आहेत.

भारतातील अशा प्रकारची ग्रामपंचायत व्यवस्था भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने पुनःग्रामपंचायतीस पुनर्जीवित करण्याचे ठरविले. त्यासाठी बलवंतराव मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने १९५७ मध्ये 'पंचायतीराज योजना' प्रस्तुत केली आणि १२ जानेवारी १९५८ मध्ये राष्ट्रीय विकास परिषदेने लोकतांत्रिक विकेंद्रीकरणाच्या शिफारशीस मान्यता दिली. बलवंतराय मेहता समितीने ग्रामवाशियांना पंचयातीराज व्यवस्थेत सक्रिय सहभाग घेण्यासाठी व त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास घडून येण्यासाठी 'त्रिस्तरीय व्यवस्था' प्रस्तूत केली. अशा पंचायतीराजचा शुभारंभ सर्वप्रथम राजस्थान मधील 'नागोर' गावात २ ऑक्टोबर १९५९ मध्ये महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी देशाचे प्रथम प्रधानमंत्री पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी केला. यानंतर पुढे सर्व राज्यांनी पंचायतीराज व्यवस्था स्विकारली.

केंद्र सरकारने लोकतांत्रिक विकेंद्रीकरणासाठी पंचयातीराज व्यवस्था मेहता समितीच्या शिफारशीनुसार स्विकारली पण पंचायतीवर नियंत्रण व संचालन करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य त्या त्या राज्यांना दिले. त्यामुळे प्रत्येक राज्यांनी वेगवेगळ्या प्रकारे पंचायतीराज व्यवस्थेची अंमलबजावणी केली. त्यामुळे पंचायतीराज व्यवस्थेत अनेक त्रुटी निर्माण झाल्या. अनुसूचीत जाती, जमाती, इतर मागासवर्ग व महिलांसाठी राखीव जागेची व्यवस्था नव्हती. त्यामुळे ते सत्तेपासून वंचित राहू लागले. निवडणूका पाच वर्षांनी घ्याव्यात असे घटनात्मक बंधन नव्हते. ग्रामपंचायतीस आर्थिक संरक्षण नव्हते. शासनाच्या कल्याणकारी योजनांचा फायदा सत्ताधारी व श्रीमंत लोकांना मिळू लागला. त्यामूळे ग्रामीण भागाचा म्हणावा तेवढा सामाजिक, आर्थिक, राजनैतिक विकास होईनासा झाला. या सर्व बाबी लक्षात घेवून भारत सरकारने पंचायतीराज व्यवस्थेत अमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये सुधारणा करण्याचे ठरविले. हिच सुधारणा ७३ वी घटना दुरूस्ती म्हणून ओळखली जाते.

भारत सरकारने पंचायतीराज संस्थांना अधिक महत्वपूर्ण आणि व्यवहारीक स्वरूप प्रदान करण्यासाठी ७३ वी घटना दुरूस्ती करून संवैधानिक मान्यता प्रदान केली. पंचायतीराज दुरूस्ती विधेयक ७२ वी घटना दुरूस्ती म्हणून १९९१ मध्ये संसदेमध्ये मांडण्यात आले. पण त्यास लवकर संसदेत मंजूरी मिळाली नाही. हे विधेयक ७३ वी घटना दुरूस्ती म्हणून १९९२ मध्ये संसदेमध्ये मंजूर करण्यात आले आणि अशा प्रकारे ७३ वी घटना दुरूस्ती विधेयक भारत सरकारच्या राजपत्रात २६ एप्रिल, १९९३ मध्ये प्रकाशित आणि परावर्तीत झाले. अशा प्रकारे ७३ वी घटना दुरूस्ती अधिनियम, अनुच्छेद २४३(अ) मध्ये पंचायतीराज संस्थाना संवैधानिक मान्यता प्रदान करण्यात आली.

भारत सरकारने उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून पंचायतीराज व्यवस्थेमध्ये अमूलाग्र बदल घडवून आणला. या पंचायतीराज व्यवस्थेत १९९३ पर्यंत अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग, महिला यांचा सक्रिय सहभाग नव्हता. सत्तेपासून वंचित असलेल्या सर्वच घटकांना ७३ व्या घटना दुरूस्तीमुळे राखीव जागा उपलब्ध झाल्या. सत्तेच्चा वाटा अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्ग, महिला, दलित यांना मिळाला. सर्वच पदांना आरक्षण निर्माण झाले. त्यामुळे ह्या सर्वच घटकांचा सामाजिक व आर्थिक विकासाचा मार्ग खुला झाला. अशाप्रकारे पंचायतीराज व्यवस्थेत महिलांना सहभागी करून घेतल्यानंतर त्यांच्या सामाजिक-आर्थिक दर्जामध्ये कितपत सुधारणा झाली आहे व महिला गावाच्या विकासासाठी कसे कामे करतात, हे पाहणे प्रस्तुत अध्ययनाचा मुख्य उद्देश आहे. कारण भारतीय समाजात प्राचीन काळापासून महिलांचा सामाजिक-आर्थिक दर्जा कनिष्ठ मानला गेला आहे. पितृसत्ताक पद्धतीमुळे महिलांना समाजात दुय्यम स्थान होते त्यामुळे महिलांना

पंचायतीराज व्यवस्थेत सहभागी करून घेतल्यानंतर अनेक शासकीय योजनांचा लाभ महिलांना मिळू लागला. त्यांना महिला सरपंच म्हणून गावात सन्मान मिळू लागला. परिणामी महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीमध्ये कितपत सुधारणा झाली हे अभ्यासणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

वरील स्पष्टीकरणावरून हे स्पष्ट होते की, पंचायतीराज व्यवस्था ग्रामीण भागाच्या विकासाच्या दृष्टीने किती महत्वपूर्ण आहे. तिचे दिवसेंदिवस महत्व वाढताना दिसत आहे. म्हणून ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर महिलांना पंचायती व्यवस्थेत सहभागी करून घेतल्यानंतर त्यांच्या सामाजिक-आर्थिक दर्जात काय बदल झाला व त्यांनी गावाच्या विकासासाठी महिला सरपंच म्हणून कोणती भुमिका बजावली यांचा अभ्यास करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील पंचायतीराज व्यवस्थेची निवड केली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या मराठवाड्यातील, औरंगाबाद या प्रशासकीय विभागातील एक जिल्हा १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्याची विभागणी करून हिंगोली जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली. लोकसंख्या ११,७७,३४५ (२०११). क्षेत्रफळ ४,८२७ चौ.किमी. राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या सु.१.५७% क्षेत्र व लोकसंख्येच्या १.०७% लोकसंख्या हिंगोली जिल्ह्यात आहे. जिल्ह्याचा विस्तार १९^{0}५’ उ. ते २०^{0}५’ उ. या अक्षांश आणि ७६^{0}३०’ पू. ते ७७^{0}३०’ पू. या रेखांशाच्या दरम्यान आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस बुलढाणा आणि वाशिम, पूर्वेस यवतमाळ आणि नांदेड, दक्षिणेस नांदेड आणि परभणी, तर पश्चिमेस परभणी या महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या सीमा आहेत. हिंगोली जिल्ह्यात हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत (बसमथ) असे पाच तालुके आहेत. हिंगोली हे जिल्ह्याचे मुख्यालय असून लोकसंख्या ८५,१०३ (२०११) होती.

भारताच्या २०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्याच्या ११,७७,३४५ या एकूण लोकसंख्येत ६,०६,२९४ पुरुष व ५,७१,०५१ स्त्रिया होत्या. लिंग गुणोत्तर दर हजारी ९४२ आहे. राज्यातील सिंधुदुर्ग व गडचिरोली जिल्ह्यांखालोखाल हा तिसऱ्या क्रमांकाचा कमी लोकसंख्येचा जिल्हा आहे. लोकसंख्येची घनता दर चौ.किमी. स २४४ व्यक्ती अशी आहे. २००१– ११ या दशकातील लोकसंख्या वाढीचा दर १९.२७% होता. नागरी लोकसंख्या १५.१८% आहे. सरासरी साक्षरता ७८.१७% असून त्यात पुरुषांची साक्षरता ८६.९४%, तर स्त्रियांची साक्षरता ६८.९५% आहेत. प्रशासकीय सोयींसाठी जिल्ह्यात दोन उपविभाग असून हिंगोली उपविभागात हिंगोलीसह कळमनुरी व सेनगाव या तालुक्यांचा समावेश होतो, तर वसमत उपविभागात वसमत आणि औंढा नागनाथ या तालुक्यांचा समावेश होतो. जिल्ह्याच्या निर्मितीबरोबरच जिल्हा परिषदेची स्थापना झाली असून पाचही तालुक्यांमध्ये पंचायत समित्या कार्यरत आहेत. हिंगोली, वसमत व कळमनुरी या तीन नगरपरिषदा आहेत. जिल्ह्यात एकूण ७११ महसुली गावे असून ५६३ ग्रामपंचायती आहेत. जिल्ह्यात

विधानसभेचे तीन, तर लोकसभेचा एक मतदारसंघ आहे. एकूणच वरील सर्व बाबी लक्षात घेवून ग्रामीण विकासात महिला सरपंचांची स्थिती पाहण्यासाठी हिंगोली जिल्ह्याची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड केली आहे. प्रस्तुत संशोधनात महिलांना पंचायतीराज व्यवस्थेत सहभागी करून घेतल्यानंतर त्यांच्या भूमिकांचा आढावा घेण्यात येईल.

2) संशोधन साहित्याचा आढावा :

कोणत्याही विषयाच्या संदर्भात संशोधन कार्य करत असताना, संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या क्षेत्रात पूर्वी झालेल्या संशोधनाचे व विशेष संबंधित असलेले ग्रंथ, लेख यांचे सर्वेक्षण करणे आवश्यक असते. कारण त्यामुळे संशोधन विषयाची व्याप्ती, वेगळेपणा समजण्यास मदत होते, तसेच अर्थबोध करताना संबंधित साहित्याचा उपयोग होतो. त्यामुळे संशोधकाने प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित असलेल्या उपलब्ध झालेल्या संशोधित साहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

i. शर्मा के. एल. (१९७४):

शर्मा के. एल. यांनी राजस्थान मधील गावांचा अभ्यास राजकीय सत्तेच्या संदर्भात केलेला असून त्यांच्या जहागीरदार, जमीनदार आणि त्यांचे अनुयायी यांच्या हाती राजकीय सत्ता होती. जाती व्यवस्थेतील श्रेष्ठ स्थानामुळे ब्राह्मण व आर्थिक समृद्धीमुळे वैश्य वर्णीयांचा प्रभाव समाजव्यवस्थेवर जसा होता, तसेच ग्रामपंचायतीवरही त्यांचे सर्वस्व होते. परंतु नवीन पंचायतराज व्यवस्थेमुळे गावातील सामाजिक परिवर्तनाला सुरुवात झाली. पंचायतीच्या निवडणुकीमुळे जाहागीरदार, जमीनदार, ब्राह्मणाऐवजी मध्यमवर्गीय व्यक्तींकडे राजकीय सत्ता येऊ लागली आहे. त्यामुळे पंचायतराज व्यवस्थेत कनिष्ठ जातीकडेही ग्रामीण नेतृत्व येऊन सत्ता संरचनेत बदल होऊ लागला आहे.

ii. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे:

यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेमधील महिलांचे योगदान पुणे जिल्हा परिषदेतील महिलांचा सामाजिक व राजकीय सहभाग हा आरक्षणविषयक दृष्टिकोन पाहिला आहे. याखेरीज महिलांची स्थानिक राजकारणातील भूमिका यांचा आढावा घेण्यात आला आहे.

iii. हजेरी डी लिमा (१९८३):

महाराष्ट्रातील स्थानिक शासनात महिला या नात्याने जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत समितीमधील महिला सदस्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय पार्श्वभूमी आणि शिक्षण, रोजगार, विवाह, कुटुंब या संदर्भातील दृष्टिकोन व जाणीव जागृती पाहणे या उद्देशाने त्यांनी सदरील अध्ययन केले. तेव्हा त्यांच्या अध्ययनाचा जो ठळक निष्कर्ष दिसतो तो म्हणजे उच्च जातीतील महिला, जमीनदारांच्या घरातील स्त्रिया आणि राजकीय प्रभाव असणाऱ्या कुटुंबातील महिलाच पंचायतराज व्यवस्थेत निवडून आलेल्या आहेत.

iv. बळीराम कटारे (२०१०):

यांनी आपल्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला पदाधिकाऱ्यांचे स्थान जालना जिल्ह्यातील महिला सरपंचांच्या कार्याचा चिकित्सक अभ्यास (१९९४-२००४) या प्रबंधातून त्यांनी काही बाबी समोर आणल्या आहेत. त्यांनी स्पष्ट केले आहे की महिला सरपंचांना त्यांचे कार्य पार पाडत असताना विविध शासकीय अधिकाऱ्यांनी सहकार्य केले पाहिजे. त्यांच्या कुटुंबांचा भार हलका केला पाहिजे अशा स्वरूपाच्या शिफारसी करण्यात आलेल्या आहेत.

v. बी. एन. शर्मा :

यांनी लोककल्याणकारी समाजातील ग्रामीण नेतृत्वासंबंधीचा अभ्यास केला त्यांचे हे अध्ययन पंचायतराज मधील नेतृत्वाची सामाजिक स्थिती आणि भूमिका यावर केंद्रित आहे.

पंचायतराज संस्था स्थापनेपासून ते आजपर्यंत अनेक स्वयंसेवी संस्था, केंद्र व राज्य सरकार, अनेक सामाजिक विचारवंत यांनी सखोल अभ्यास व संशोधन करून प्रचंड असे लिखित साहित्य प्रकाशित केले आहे. मात्र हा सर्व अभ्यास पंचायतराज संस्थाच्या विविध कायद्याबद्दल, रचनाबदल, निवडणूकासंबंधी, राजकिय नेतृतवासंबंधी, नेतृत्वाच्या दृष्टीकोणासंबंधी, विकास कार्यक्रम इत्यादी बदल केल्याचे दिसून येते. पंचायतराज आरक्षणानंतर ग्रामीण विकासात महिला सरपंचांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा) या विषयाची निवड केलेली आहे.

३) संशोधन विषय :

"ग्रामीण विकासात महिला सरपंचांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा) या विषयाच्या संदर्भात संशोधन केले जाईल. या संशोधनात हिंगोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या महिला सरपंचांच्या भूमिका यांबद्दल समाजशास्त्रीय अध्ययन करून वास्तविक तथ्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जाईल. भारतीय समाजात आजही महिलांना पितृसत्ताक पद्धतीमुळे दुय्यम स्थान आहे. भारतीय समाजात प्राचीन काळापासून महिलांचा सामाजिक-आर्थिक दर्जा दुय्यम मानला गेला आहे. ७३ व्या घटना दुरूस्तीनंतर पंचायतीराज व्यवस्थेत महिलांना आरक्षण देवुन सहभागी करून घेतल्यानंतर अनेक शासकीय योजनांचा लाभ महिलांना मिळू लागला, पंचायतीराज आरक्षणामुळे ग्रामीण राजकारणात आणि अर्थकारणात महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक स्थितीमध्ये कितपत सुधारणा झाली? त्यांचे विविध पैलू, कार्यकारण भाव आणि परिणामात्मकता यांचे वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने "ग्रामीण विकासात महिला सरपंचांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन" (विशेष संदर्भ : हिंगोली जिल्हा) हा विषय निवडण्यात आला आहे.

४) संशोधनाचे महत्व :

पंचायतीराज आरक्षणानंतर महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकिय स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्याची आवश्यकता जाणवली, त्यामागील कारणे अशी आहेत.

४.१ पंचायतीराज आरक्षणानंतर महिलांनची राजकीय व सामाजिक स्थिती जाणून घेण्याच्या दृष्टीने हे अध्ययन महत्वपूर्ण आहे.

४.२ पंचायतीराज व्यवस्थेतील आरक्षणानंतर महिलांची राजकारणातील संधी, भूमिका आणि वास्तवस्थितीचे आकलन होण्याच्या दृष्टीने या संशोधनाला विशेष महत्व आहे.

४.३ पंचायतीराज व्यवस्थेतील आरक्षणानंतर महिला सरपंचांचा समाजातील दर्जा व भुमिका जाणून घेण्यासाठी हे संशोधन सहाय्यभूत ठरणारे आहे.

४.४ ७३ व्या घटनादुरूस्तीने महिलांना राजकारणात मिळालेल्या प्रतिनिधीत्वचा कितपत लाभ झाला आहे. या विषयीची सत्यता जाणून घेण्याच्या दृष्टीने या संशोधनाची आवश्यकता आहे.

४.५ पंचायतीराज आरक्षणानंतर पुरुषसत्ताक व्यवस्थेचा महिला सरपंचांकडे पाहण्याच्या बदलत्या दृष्टीकोणाची दिशा जाणून घेण्यासाठी या अध्ययनाचे महत्व आहे.

४.६ ग्रामीण विकासात महिला लोकप्रतिनिधीचा सहभाग आणि त्यांचा विकासात्मक दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी या संशोधनाची आवश्यकता आहे.

५) संशोधनाची उद्दिष्ट्ये :

पंचायतीराज व्यवस्था संपूर्ण भारतात लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे अध्ययन विषयाची व्यापकता, समग्राचा विखूरलेपणा तसेच अध्ययन विषयाचे विविध पैलू या सर्वांचा विचार करून केवळ हिंगोली जिल्ह्यातील पंचायतीराज व्यवस्थेतील आरक्षणानंतर महिलांच्या सामाजिक राजकीय स्थितीचे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात येईल. संशोधन करताना वेळ, श्रम, पैसा यांचा योग्य पध्दतीने वापर करता यावा, संशोधनाला योग्य दिशा मिळावी, संशोधन निश्चित उद्दिष्टपूर्ती करणारे असावे यासाठी प्रस्तुत संशोधनात काही निर्धारित करण्यासाठी काही उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

५.१ महिला सरपंचांच्या वैयक्तिक, सामाजिक व राजकीय माहितीच्या आधारे त्यांच्या दर्जाचे आकलन व विश्लेषण करणे.

५.२ पंचायतीराज संस्थात आरक्षण दिल्यानंतर महिला सरपंच म्हणून संबोधलेल्या दलित जाती व उच्च जाती यांच्यातील सामाजिक संबंधाचे अध्ययन करणे.

५.३ अनेक वर्ष सत्तेपासून व हक्कांपासून दूर असलेल्या महिलांना पंचायतीराज व्यवस्थेत सहभागी करून घेतल्यानंतर त्यांच्यातील झालेल्या सुधारणाचे अध्ययन करणे.

५.४ पंचायतीराज संस्थामध्ये महिलांना प्रतिनिधीत्व देण्यामागील उद्देशांच्या यशस्वीतेचे मूल्यमापन करणे.

५.५ हिंगोली जिल्ह्यातील वेगवेगळ्या वर्गातून निवडून आलेल्या महिला सरपंच यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

५.६ महिला सरपंचांच्या सामाजिक,आर्थिक,राजनैतिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

५.७ ग्रामीण विकासात महिलांचा सक्रिय सहभाग कितपत आहे अभ्यासणे.

६) संशोधनातील गृहितके :

संशोधन अध्ययन निश्चित केल्यानंतर संशोधनाची दिशा निर्धारित करण्यासाठी संशोधन समस्येचे संभाव्य उत्तर शोधले जाते. या संभाव्य उत्तराला लक्षात घेऊन त्या आधारावर संशोधन कार्य पूर्ण केले जाते. या निश्चित केलेल्या गृहितकांमूळे संशोधनाला योग्य दिशा प्राप्त होते. गृहितकृत्य हे संशोधन समस्येचे एक संभाव्य उत्तर किंवा स्पष्टीकरण असते. संशोधन विषयाच्या पूर्वज्ञानाच्या आधारे किंवा उपलब्ध माहितीच्या आधारे गृहितकृत्यांची निर्मिती केली जाते. त्यामुळे संशोधकाचे लक्ष आपल्या अध्ययन विषयावर केंद्रित होण्यास मदत होते. गृहितकृत्य हे एक प्रकारचे अनुमान आहे. त्यामुळे वास्तविक तथ्य संकलित करण्यास मदत होऊन संशोधनाची दिशा निर्धारित होते.

६.१ पंचायतीराज व्यवस्थेमध्ये महिलांना आरक्षण दिल्यानंतर महिलांचा ग्रामीण विकासात सहभाग वाढला आहे.

६.२ पंचायतीराज व्यवस्थेमध्ये महिलांना आरक्षण दिल्यामुळे पुरुषी मानसिकतेचा महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे.

६.3 पंचायतराज निर्णय प्रक्रियेत महिला पदाधिकाऱ्यांचा सहभाग असल्यामुळे ग्रामीण भागातील महिलांचे प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे.

६.४ पंचायतराज आरक्षणामुळे महिलांचा राजकारणातील सहभाग वाढला आहे.

६.५ पंचायतीराज व्यवस्थेत महिलांना आरक्षण दिल्यानंतर ग्रामीण भागाचा जलद विकास होत आहे.

७) संशोधन व्याप्ती व कालावधी :

कोणत्याही विषयाची व्याप्ती निश्चित करणे कठीण काम आहे. पंचायतीराज आरक्षणानंतर महिलांच्या सरपंच म्हणून भूमिका व त्यांचा सामाजिक दर्जा यांच्या स्थितीचे अध्ययन केले जाईल. संशोधन कार्यामध्ये सुरळीतपणा येण्यासाठी विषयाची भोगोलिक व्याप्ती, पर्यायाने भौगोलिक मर्यादा ठरविणे आवश्यक आहे. म्हणून हिंगोली जिल्ह्यातील पंचायतीराज व्यवस्थेत आरक्षणानंतर जी

महिलांची पार्श्वभूमी आहे. तीच या संशोधनाची मर्यादा ठेवली जाईल. त्यामुळे हीच या संशोधनाची मर्यादा आहे.

हिंगोली जिल्ह्यात एकूण ५ तालुके आहेत. प्रत्येक तालूक्यातून २० एकूण १०० उत्तरदात्यांची निवड करून त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे मुलाखत अनुसुची भरून घेण्यात येईल. प्रस्तुत विषयाचे महत्व, स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता यातील निवडलेल्या संख्या समग्राच्या मानाने मर्यादितच राहतील. संशोधकाने वस्तुनिष्ठ व विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठी प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेतल्या जातील.

प्रस्तुत संशोधनासाठी विषयाची व्यापकता लक्षात घेता संशोधनास ३६ महिण्याचा कालावधी लागेल. हे संशोधन कार्य २०२३ ते २०२६ या कालावधीत पूर्ण केले जाईल. हिंगोली जिल्ह्यातील पंचायतीराज व्यवस्थेतील केवळ ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या महिला प्रतिनिधीना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेऊन अनुसूची भरून घेतली जाईल. प्रस्तुत संशोधनासाठी ३६ महिन्यांचा कालावधी गृहीत धरण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी १० महिने, क्षेत्रीय कार्यासाठी १० महिने, माहिती विश्लेषणासाठी ६ महिने व अहवाल लेखनासाठी १० महिने लागतील.

८) संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी उपयोगात आणलेली संशोधन पद्धती पुढील प्रमाणे राहील.

८.१ संशोधन आराखडा :

पंचायतीराज आरक्षणानंतर महिलांचा सरपंच म्हणून सद्यस्थितीतील सामाजिक दर्जा व त्यांच्या भुमिका या स्थितीच्या अनुषंगाने तथ्य संकलन करण्यात येईल. प्रस्तुत संशोधनात्मक अध्ययनासाठी "अन्वेषणात्मक आराखडा व निदानात्मक आराखडा" प्रमाणभूत मानण्यात येईल. विशिष्ट व्यक्तीच्या, समूहाच्या व स्थितीच्या वैशिष्ट्यांचे यथातथ्य वर्णन करणे हा वर्णनात्मक अध्ययनाचा हेतू असतो. वर्णनात्मक आराखड्यात संशोधनाची उद्दिष्ट्ये, नमुना निवड, तथ्य संकलन पद्धती, तथ्यांवर संस्करण, संकेतन इत्यादी पायऱ्याबाबत संशोधकाला अनेक निर्णय घ्यावे लागतात. तर विशिष्ट सामाजिक कार्यकारणांचा, समस्येच्या निदानाचा शोध घेण्याचा संशोधन कार्य प्रकारास

निदानात्मक संशोधन म्हणतात. या अध्ययनात वर्णनात्मक व निदानात्मक आराखड्याचा वापर करून शोध अध्ययन अधिकाधिक सैध्दांतिक करण्याचा प्रयत्न जाईल.

८.२ नमुना निवड :

पंचायतीराज आरक्षणानंतर महिलांच्या भुमिका यांचे समाजशास्त्रीय अध्ययन या संशोधन विषयाच्या संदर्भात आवश्यक तथ्य संकलित करण्यासाठी गैरसंभाव्यता नमुना निवड पध्दती अंतर्गत 'सहेतूक नमुना' पध्दतीने उत्तरदात्यांनी निवड करण्यात येणार आहे. तरी देखील उत्तरदात्यांची निवड करतांना पूर्वग्रह येणार नाही याची काळजी घेतली जाईल. 'ग्रामपंचायतीत निवडून आलेले महिला सरपंच' या समग्रातील सर्व एककांच्या ऐवजी एकूण संपूर्ण समग्राचे प्रतिनिधीत्व केले जाईल इतक्या प्रमाणात समग्रातील एककांचा नमुन्यात समावेश करण्यात येईल. अशा आकाराचे कितीही नमुने निवडून त्यांचे अध्ययन केले असता येणाऱ्या निष्कर्षात व समग्राच्या चाचणीत अधिकचे अंतर असणार नाही, अशा पद्धतीने एकूण समग्रातून १०० एककांचा म्हणजेच नमुन्यांचा अंतर्भाव करण्यात येईल . संशोधनात एकक ही संज्ञा ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या एका महिला प्रतिनिधीसाठी उपयोगात आणली जाईल.

२०११ च्या जनगणनेनुसार हिंगोली जिल्ह्याची लोकसंख्या ११,७७,३४५ आहे. त्यात एकूण लोकसंख्येच्या ५,७१,०५१ एवढी महिलांनची तर ६,०६,२९४ एवढी पुरुषांची संख्या आहे. हिंगोली जिल्ह्यात ५ तालुके आहेत. एकूण गावांची संख्या ७११ असून ५६३ ग्रामपंचायती आहेत. परंतू संशोधन विषयाच्या अनुषंगाने महिला सरपंचांच्या भुमिका व यांचे अध्ययन करण्यासाठी ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या १०० महिला सरपंचांची निवड करण्यात आलेली आहे.

८.३ तथ्य संकलनाची तंत्रे :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतांचा वापर करून तथ्य संकलित करण्यात आलेले येईल.

८.३.१ प्राथमिक स्त्रोत :

तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतातील प्रश्नावली व मुलाखत तंत्राचा वापर करण्यात येईल. मुलाखत अनुसूची तयार करतांना संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये केंद्रस्थानी मानली जातील. मुलाखत

अनुसूची तयार करतांना पंचायतीराज मध्ये निवडून आलेल्या महिला सरपंच यांचा दर्जा व भुमिका यासंबंधी माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. ग्रामपंचायतीतील निवडून आलेल्या महिला सरपंच यांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक स्थितीचे व ग्रामीण विकासाबाबद्दल चा त्यांचा विचार, त्यांचे कार्य याचे समाजशास्त्रीय अध्ययन होण्याच्या अनुषंगाने विविध प्रश्नांचा समावेश मुलाखत अनुसूचीत करण्यात येईल.

८.३.२ दुय्यम स्त्रोत :

अध्ययन विषयाशी अनुषंगिक दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी विविध ठिकाणच्या ग्रंथालयांना भेटी देऊन तेथे उपलब्ध असलेले संशोधन विषयाशी संबंधित प्रकाशित-अप्रकाशित असलेले शोध प्रबंध, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका, संकेत स्थळे इ. दुय्यम स्त्रोताच्या माध्यमातून तथ्य संकलन करण्यात येईल. तसेच हिंगोली जिल्ह्याधिकारी कार्यालय, जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जिल्हापरिषद कार्यालय, तहसिल कार्यालय यांना प्रत्यक्ष भेटी देऊन व त्यांनी प्रकाशित केलेल्या विषयांच्या अनुषंगाने विविध अहवाल दुय्यम तथ्य संकलनासाठी केले जातील.

८.४ तथ्य विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनात संकलीत तथ्यांचे विश्लेषण आणि संख्यात्मक विवेचन करता यावे यासाठी प्रथम तथ्यांचे सांकेतिकरणाच्या आधारे वर्गीकरण करण्यात येईल. संकलित तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण आणि सांकेतीकरण झाल्यानंतर तथ्यांचे विश्लेषण केले जाईल. अशा रितीने संशोधन विषयाच्या अनुषंगाने वस्तुनिष्ठ सामग्री प्राप्त करण्याचे उद्दिष्ट कोणताही पूर्वग्रह न बाळगता पूर्ण करून संशोधन कार्य कार्यान्वित केले जाईल. यातून अंतिम निष्कर्ष काढणे, नवीन सिध्दांताची मांडणी करणे, शिफारशी सुचविणे संशोधकास शक्य होईल.

९) संशोधन अहवालाची मांडणी :

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या अनुषंगाने अध्ययन विषय एकूण सहा प्रकरणांमध्ये मांडण्यात आला आहे.

९.१ प्रकरण पहिले : प्रस्तावना

शोधप्रबंधाच्या या प्रकरणात प्रस्तावना, भारतीय समाज संरचना, भारतीय समाजातील पितृसत्ताक पद्धती, संकल्पना, अर्थ व स्वरूप, महिला आणि विकास, महिलांची ऐतिहासिक पार्श्वभूमी त्यात वैदिक काळ, उत्तरवैदिक काळ, मध्ययुगीन काळ, ब्रिटीश काळ आणि आधुनिक काळ. महिला कल्याण कार्यक्रम. महिला सक्षमीकरणासाठी धोरणे, भारतीय संविधानातील महिलांनविषयक तरतुदी, भारतीय समाजातील महिलांची सद्यस्थिती, पंचायतीराज व्यवस्था, पंचायतीचा उगम आणि विकास त्यात पंचायतीचा प्राचीन काळ, मौर्यकाळ व गुप्तकालीन पंचायत व्यवस्था, मोगल काळ, ब्रिटीश कालखंड, स्वातंत्र्योत्तर कालखंडातील पंचायत व्यवस्था, ७३ वी घटना दुरूस्ती महाराष्ट्रातील पंचायतीराज व्यवस्था इत्यादी अनुषंगिक घटकांची स्पष्टीकरणात्मक मांडणी करण्यात येईल. तसेच शेवटी पूर्वलिखित संबंधित संशोधन साहित्याचा आढावा संबंधित संदर्भ ग्रंथातील अध्ययन विषयाच्या अनुषंगाने घेण्यात येईल.

९.२ प्रकरण दुसरे : संशोधन पद्धती

शोधप्रबंधाच्या या प्रकरणात अध्ययनाच्या अनुषंगाने प्रस्तावना, संशोधन विषय ओळख, संशोधन विषयाची निवड, संशोधन कार्यक्षेत्राची निवड, संशोधन विषयाची मर्यादा, संशोधन कार्यक्षेत्राची ओळख, हिंगोली जिल्हा : एक दृष्टिक्षेप, त्यात हिंगोली जिल्ह्याचे स्थान आणि भौगोलिक स्थिती, लोकसंख्या, शिक्षणाच्या सोई, वैद्यकीय व आरोग्य सेवा इत्यादीची मांडणी करण्यात येईल. तसेच संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनातील गृहितके, संशोधन आराखडा, नमुना निवड, तथ्य संकलनाची तंत्रे, तथ्य संकलन, तथ्यांचे वर्गीकरण, सामग्री संस्करण, विश्लेषन व अर्थनिर्वचन इत्यादी संशोधन पध्दतीच्या शास्त्रीय कसोट्यांची मांडणी करण्यात येईल.

९.३ प्रकरण तिसरे : उत्तरदात्यांची वैयक्तिक माहिती

शोधप्रबंधाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या महिला सरपंचांची सामान्य माहिती घेण्यात येईल.

९.४ प्रकरण चौथे : पंचायतीराज व महिलांचा राजकीय सहभाग

प्रस्तुत संशोधन अहवालाच्या चौथ्या प्रकरणात ग्रामपंचायतीमध्ये निवडून आलेल्या महिला सरपंच म्हणजेच उत्तरदात्यांची ग्रामीण विकास कार्याप्रती आवड, निवडणूकीत सहभागी होण्याची प्रेरणा, मतप्राप्तीचा आधार, निवडून आलेल्या प्रभागातील मतदारांचा सवर्ग, ७३ वी घटना दुरूस्ती व महिलांचा राजकारणातील सहभाग, पंचायतीराज आरक्षणाचा सर्वाधिक फायदा होणारा संवर्ग,

उत्तरदात्यांच्या कुटूंबातील राजकीय पार्श्वभूमी, महिला नेतृत्व विकासातील आरक्षणाची भूमिका, उत्तरदात्यांचे राजकारण प्रवेशपूर्व क्षेत्र, आरक्षणामुळे महिलांच्या जीवनात घडून आलेला विकास, ग्रामपंचायतीच्या मासिक सभेची नियमितता, ग्रामसभेच्या आयोजनाची नियमितता, मासिकसभा आणि ग्रामसभा यातील उपस्थिती, महिला सरपंचांच्या सूचनांची दखल व आमलंबजावणी, सहकार्य विषयक प्रतिक्रिया, महिला सरपंच असलेल्या गावात उपसरपंचाची भूमिका, पंचायतराज व्यवस्थेतील महिलांच्या सहभागामुळे पुरुषांचे वर्चस्व कमी होण्याविषयीची प्रतिक्रिया, भविष्यात पंचायत राजकारणात सक्रिय सहभाग विषयक प्रतिक्रिया, विश्लेषण इत्यादी चलांच्या माध्यमातून मुलाखत अनुसूचीच्या आधारे तथ्य संकलीत करण्यात येतिल.

९.५ प्रकरण पाचवे : आरक्षणानंतर महिलांचा सरपंच म्हणून भूमिका व दर्जा

७३ व्या घटनादुरूस्तीनंतर पंचायती संस्थामध्ये महिलांना सहभागी करून घेण्यासाठी आरक्षणाची तरतुद करण्यात आली. या घटनादुरूस्तीने महिलांच्या सामाजिक दर्जा व आर्थिक स्थितीमध्ये कोणत्या स्वरूपाचे परिवर्तन झाले आणि आजची त्यांची सामाजिक भुमिका व दर्जा नेमका कसा आहे? या विषयीची विश्लेषणात्मक मांडणी प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्यात येईल.

महिलांचा दर्जा सुधारण्यासाठीची प्रक्रिया, शासकीय योजनांची माहिती, शासकीय योजनासंबंधी माहितीचा स्रोत, शासकीय योजनांचा लाभ, विविध महामंडळाच्या योजनाचा लाभ, शैक्षणिक सवलतीचा लाभ, सामाजिक न्याय विभागाच्या योजनाचा लाभ, विशेष सहाय्य योजनाचा लाभ इत्यादी चलाचे अध्ययन करण्यात येईल.

९.६ प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

अध्ययन विषयाच्या प्रस्तुत प्रकरणामध्ये उत्तरदात्यांकडून संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे संशोधकांनी निष्कर्षाची मांडणी जाईल. या अध्ययनाच्या आधारे पंचायतीराज आरक्षणानंतर महिला सरपंच यांच्या स्थितीत झालेले बदल त्यांचा भुमिका अनुषंगाने येणाऱ्या अडथळ्यावर आणि विविध समस्यावर उपाययोजना करण्यासाठी शिफारशी सुचविल्या जातील.

१०) संदर्भ ग्रंथ सूची :

१) आवळे मनोज, २००७, पंचायतराज कार्य कायदा योजना', पुणे, अनुबंध प्रकाशन.

२) आहुजा राम, २००२, सामाजिक समस्याएं', जयपूर, रावत पब्लिकेशन्स.

३) आंबेडकर बाबासाहेब, संपादक प्रदीप गायकवाड, २००८, 'भारतीय संविधान', नागपूर, दीक्षाभूमी संदेश.

४) दर्शनकार ए.आर., १९७९, 'पंचयात परिवर्तनाचे नवे पर्व', कोल्हापूर, समाजवादी प्रबोधनाचे प्रकाशन.

५) घाटोळे रा. ना. १९९४, 'ग्रामीण समुदाय व सामुदायिक विकास', नागपूर, श्री मंगेश प्रकाशन.

६) आगलावे प्रदिप, २००१, 'संशोधन पध्दती व तंत्रे', नागपूर, विद्या प्रकाशन.

७) गुप्ता ममता, १९९८, 'धर्मगाथा और जातीय संघर्ष', दिल्ली, राधाराणी प्रकाशन.

८) नांदेडकर व्ही. जी. २००६, 'पंचयातराज एक विश्लेषणात्मक परामर्श' पुणे, सागर पब्लिकेशन्स.

९) पांडे राम, १९८९, 'पंचायतीराज', जयपूर, पब्लिशिंग हाऊस.

१०) पटवर्धन सुनंदा, १९९६. पंचायत ॲन्ड रुरल डेव्हलपमेंट इन वेस्ट बंगाल, जर्नल ऑफ डेलमेट.

११) रावत हरिकृष्ण, २००४, 'समाजशास्त्र विश्वकोष', जयपूर, रावत पब्लिकेशन.

१२) शर्मा कालूराम व शर्मा प्रकाशन, १९९९, 'भारत का इतिहास एवं संस्कृती', जयपुर, पंचशील प्रकाशन.

१३)भांडारकर पू.ल. १९९९, 'सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मित.

संशोधक विद्यार्थिनी

शुभांगी प्रभाकर जावळे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. आनेराव एम. एम.
(समाजशास्त्र विभाग प्रमुख)
लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड
ता. लोहा जि. नांदेड